मराठा विद्या प्रसारक समाजाचे,

# गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सिन्नर, जि. नाशिक.

## रासेयो विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर अहवाल- २०२३-२४

मराठा विद्या प्रसारक समाजाचे गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला भगवंतराव वाजे वाणिज्य विज्ञान महाविद्यालय आणि  सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दिनांक 18 जानेवारी ते 24 जानेवारी 2024 या कालावधीत संपन्न झालेल्या विशेष शिवाय संस्कार शिबिराचे अहवाल वाचन मी प्रमुख कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक ललित कळसकर करत आहे



शिबिराच्या पहिल्या दिवशी म्हणजे गुरुवार दिनांक 18 जानेवारी 2024 रोजी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना एकक 125 स्वयंसेवकांसह धारणगाव तालुका सिन्नर येथे दाखल झाले या दिवशी प्राथमिक शाळा आणि सभागृह परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली याबरोबरच दुपारच्या वैचारिक प्रबोधनांमध्ये सोमनाथ शिरोळे यांचे आजचा युवक आणि ग्रामविकास या विषयावर व्याख्यान संपन्न झाले




शुक्रवार दिनांक 19 जानेवारी 2024 रोजी विशेष शिवाय संस्कारात शिबिराचे उद्घाटन महाविद्यालय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष माननीय श्री एडवोकेट राजेंद्र घुमरे यांच्या अध्यक्षतेखाली आणि निफाड चे गटविकास अधिकारी माननीय डॉक्टर विजय बागुल, सिन्नरचे गटविकास अधिकारी माननीय राजेश दामसे तसेच संस्थेचे जेष्ठ सभासद आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती श्री विठ्ठलराव राजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडले या दिवशी शिबिरातील सहभागी स्वयंसेवकांनी ग्राम स्वच्छता अभियान वापरले यामध्ये गावातील कचऱ्या बरोबरच गाव प्लास्टिक मुक्त करण्यात आले या दिवशी वैचारिक प्रबोधनांमध्ये प्राध्यापक राजाराम मुंगसे यांचे विद्यार्थी विकास आणि समाज या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते




**शनिवार दिनांक 20 जानेवारी 2024 रोजी स्मशानभूमी आणि त्यालगतचा परिसर पूर्णपणे स्वच्छ करण्यात आला दु पारच्या वैचारिक प्रबोधनामध्ये ह भ प सागर महाराज काळे आणि कुमारी समीक्षा चव्हाण के यांचे आजचा युवक आणि ग्रामविकास या विषयावर वैचारिक प्रबोधन झाले**



रविवार दिनांक 21 जानेवारी 2024 रोजी शिबिर स्थळापासून जवळच असलेल्या देवपूर येथील सुप्रसिद्ध ऐतिहासिक वास्तू राणी खान वाडा आणि समाधीला भेट दिली याप्रसंगी देवपूर येथील ग्रामस्थ माननीय श्री गणेश गडाख यांनी राणे खान वाडा व देवपूर मधील अध्यात्मिक गुरुबाबा भागवत यांच्या समाधी विषयी विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण माहिती दिली याप्रसंगी राने खान वाडा परिसरातील देव नदी पात्राची स्वच्छता मोहीम राबविण्यात आली तसेच दुपारच्या वैचारिक प्रबोधनाच्या कार्यक्रमांमध्ये प्राध्यापक जावेद शेख यांचे शिवचरित्र या विषयावर व्याख्यान पार पडले




सोमवार दिनांक 22 जानेवारी 2024 रोजी सामाजिक सभागृहाच्या आजूबाजूच्या परिसरातील संपूर्ण स्वच्छता करण्यात आली तसेच अयोध्येमध्ये राममूर्तीची प्रतिष्ठापना होणार असल्याच्या निमित्ताने गावांमधील सर्व मंदिरांची पाणी टाकून धुवूनस्वयंसेवकांनी स्वच्छता केली व गावाच्या वतीने काढण्यात आलेल्या शोभायात्रेत सहभाग नोंदवला दुपारच्या वैचारिक प्रबोधनांमध्ये नाशिक येथील सुप्रसिद्ध डॉक्टर प्रकाश पांगम्म यांचे तरुणांमधील रक्ताचे वाढते आजार या विषयावर बहुमोल व्याख्यान संपन्न झाले




मंगळवार दिनांक 23 जानेवारी 2024 रोजी धारणगाव फाटा ते धारणगाव आणि सामाजिक सभागृहाबरोबरच स्मशानभूमी या परिसरामध्ये स्वयंसेवकांच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले दुपारच्या वैचारिक प्रबोधनामध्ये प्राचार्य डॉक्टर पीव्ही रसाळ यांचे मूल्यशिक्षण या विषयावर बहुमोल व्याख्यान पार पडले.


राष्ट्रीय सेवा योजना
विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर
उद्घाटन समारंभ
१८ जानेवारी ते २४ जानेवारी २०२४






बुधवार दिनांक 24 जानेवारी 2024 रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा परिसरामध्ये स्वच्छता मोहीम राबवण्यात आली तसेच दुपारी अकरा वाजेनंतर समारोप समारंभ पार पडत आहे याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मविप्र समाजाचे अध्यक्ष माननीय डॉक्टर सुनील ढिकले हे उपस्थित आहे तर प्रमुख अतिथी म्हणून मराठा विद्या प्रसारक समाजाचे सन्माननीय संचालक माननीय श्री कृष्णाजी भगत व जिल्हा परिषदेच्या सदस्य

**सन्माननीय श्रीमती श्रीमंतिनीताई कोकाटे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर पी व्ही रसाळ व इतर मान्यवर उपस्थित आहे.**




Programme Officer
National Service Scheme
G.M.D. Arts, B.W. Commerce
& Science College, Sinnar

Principal
G. M. D. Arts, B. W. Commerce and
Science College, Sinnar, Dist.Nashik